# <u>प्रेस नोट</u>

## <u>परीमंडळ २ पुणे शहर विभागातील बंडगार्डन पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत</u>

दिनांक :- १०/०९/२०१८

बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे संतोष सुरेश कांबळे, वय २३ वर्षे, रा. लोकसेवा तरुण मंडळाजवळ, १३ ताडीवाला रोड, पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक १४/२०१८ दिनांक १०/०९/२०१८ रोजी एक वर्षाकरीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर तडीपार इसम संतोष सुरेश कांबळे, वय २३ वर्षे, रा. लोकसेवा तरुण मंडळाजवळ, १३ ताडीवाला रोड, पुणे हा गंभीर जखमी करणे, नुकसान करणे, शिवीगाळ करुन हाताने मारहाण करणे, सामाईक इरादा, दंगा करणे, बेकायदेशिर जमावात सामील होणे, प्राणघातक शस्त्रानिशी सज्ज होवून दंगा करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द बंडगार्डन आणि कोरेगावपार्क पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन एक वर्षाकरीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.